**L. A. BILL No. I OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

**१.** या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी २७१४–१ (४४६–३-२०२३)

## प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मध्ये, “पाच पालिका सदस्य” या मजकुराऐवजी, “दहा नामनिर्देशित पालिका सदस्य” हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८८८ चा ३.

## प्रकरण तीन

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (ब) मध्ये, “ पाच पेक्षा अधिक नसतील इतक्या ” या मजकुराऐवजी, “ निवडून आलेल्या पालिका सदस्यांच्या एकूण संख्येच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसतील इतक्या किंवा दहा, यापैकी जी कमी असेल इतक्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९४९ चा ५९.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) याच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (१) मधील खंड (ब) मध्ये अशी तरतूद आहे की, पालिका प्रशासनातील विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेल्या पाच नामनिर्देशित पालिका-सदस्यांचा, महानगरपालिकेत समावेश असेल आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२) मधील खंड (ब) मध्ये अशी तरतूद आहे की, पालिका प्रशासनातील विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेल्या पाच पेक्षा अधिक नसतील अशा संख्येतील नामनिर्देशित पलिका-सदस्यांचा प्रत्येक महानगरपालिकेत समावेश असेल.

२. पालिका प्रशासनातील ज्ञान व अनुभव असलेल्या व्यक्तीला, राज्यातील महानगरपालिकांच्या अधिक प्रभावी प्रशासनासाठी पालिका-सदस्य म्हणून नामनिर्देशित केले जाते. अशा प्रकारे नामनिर्देशित केलेल्या पालिका-सदस्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा वापर करून, महानगरपालिकांच्या कामकाजात गुणात्मक रीतीने सुधारणा करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नामनिर्देशित पालिका-सदस्यांची संख्या पाच वरून दहा आणि राज्यातील इतर महानगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची संख्या पाच पेक्षा अधिक नसतील वरून एकूण संख्येच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसतील इतक्या किंवा दहा, यापैकी जी कमी असेल इतक्या पालिका-सदस्यांच्या संख्येत वाढ करणे इष्ट आहे असे शासनास वाटते. म्हणून, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५(१)(ब) आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ (२)(ब) यांमध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३.

**एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.

**सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १-मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट**

**(मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ यातील उतारे)**

**(सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३)**

**१.** ते **४.** ** ** ** **

**५.** (१) महानगरपालिका पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :– महानगरपालिकेची रचना.

(अ) ** ** ** **

(ब) महानगरपालिकेने विहित रीतीने नामनिर्देशित करावयाचे, पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेले पाच पालिका सदस्य :

परंतु, महानगरपालिकेची सध्याची मुदत समाप्त होईपर्यंत या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट परिणामकारक नाही.

(२) ** ** ** **

**५अ.** ते **५ब.** ** ** ** **

**६.** ते **५२७अ.** ** ** ** **

**अनुसूची.** ** ** ** **

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ यातील उतारे)**

**(सन १९४९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९)**

**१.** ते **४.** ** ** ** **

महानगरपालिकेची रचना.

**५.** (१) ** ** ** **

(२) प्रत्येक महानगरपालिका पुढील सदस्यांची बनली असेल –

(अ) ** ** ** **

(ब) विहित करण्यात येईल अशा रीतीने महानगरपालिकेने नामनिर्देशित करावयाचे पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेले, पाच पेक्षा अधिक नसतील इतक्या संख्येतील पालिका सदस्य.

(३) ते (५) ** ** ** **

**५अ.** ते **५ब.** ** ** ** **

**६.** ते **४९३.** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.]**

[ **मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.** ]

[**श्री. एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.]

[ **विधानसभेने दिनांक २ मार्च २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई